# प्रबोधन
गोरेगाव

## ३१ वा वार्षिक अहवाल
## २००२-२००३












# प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४.
दूरध्वनी : २८७३ ४८ ६९, २८७२ ६२ ७८
www.prabodhan.org
संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदवलेली संस्था (Regn. No. Mum. 46/72 GB BSD)
मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये नोंदवलेली संस्था (Regn. No. F 2502 Mum.)
आयकर कलम ८०-G खाली देणग्या करमुक्त

## पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

२००२-२००३

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | **डॉ. मनोहर अद्‌वानकर,** एम्.एस्.सी., पीएच्.डी. |
| उपाध्यक्ष | : | **ॲड्. विकास रेळे,** बी. ए., एलएल्.बी. |
| | | **श्री. सुरेश चव्हाण,** बी. ए. |

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | **श्री. मिलिंद डुंबरे,** बी.कॉम. |
| प्रमुख कार्यवाह | : | **श्री. शशांक कामत,** बी.कॉम. |
| सहकार्यवाह | : | **श्री. सुनिल कविश्वर** |
| | | **श्री. भूषण काळे** |
| खजिनदार | : | **श्री. नितीन शिंदे,** बी.ए., डी. जे. |

## सभासद

**श्री. चंद्रकांत देऊलकर**
**श्री. जेकब जॉन्सन**
**श्री. सुधीर मिठबावकर,** बी.एस्‌सी., बी.एड्.
**श्री. पांडुरंग पोखरकर,** बी.एस्‌सी.
**श्री. श्रीनिवास शिरसेकर,** जी.डी. आर्टस्
**श्री. अनिल देसाई**
**श्री. चाको मॅथ्यू**
**श्री. विनोद निंबाळकर**
**श्री. चंद्रकांत पोतदार**
**श्री. समीर त्रैलोक्य,** बी.एस्‌सी.

## स्वीकृत सभासद

**श्री. सचिन सावंत,** बी.कॉम.

## अंतर्गत हिशेबतपासनीस

**श्री. विवेक जोशी,** बी.कॉम्., एफ्.सी.ए.

## सनदी लेखापाल

**श्री. जयंत आपटे,** बी.कॉम्., एफ्.सी.ए.

## प्रबोधन बालवाडी

समाजाच्या अविकसित घटकांना उपयुक्त ठरणारे उपक्रम प्रबोधन यथाशक्ति आयोजित करीत असते. त्यानुसार जवाहर नगर, गोरेगाव (प.) व कोयना वसाहत, गोरेगाव (पू.) येथील झोपडपट्टी विभागात दोन बालवाड्या प्रबोधन संस्थेतर्फे माफक शुल्कात चालविण्यात येतात. ह्या दोन्ही बालवाड्यात असलेल्या ८० बालकांना पूर्व प्राथमिक स्वरुपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येते. असे शिक्षण घेतलेल्या मुलांनी पुढे शालेय शिक्षणात विशेष चमक दाखविल्याचे नजरेस आले आहे. संस्थेस सदर बालवाड्यांचे कार्य नियमित चालू ठेवण्यासाठी **सौ. शालिनी वारीसे** यांचे स्थापनेपासून मोलाचे सहकार्य लाभले आहे. प्रतिवर्षी ह्या बालवाड्यांसाठी **सारस्वत बँकेचे** आर्थिक सहकार्य उपलब्ध होते हे कृतज्ञता पूर्वक नमूद करणे आवश्यक आहे. संस्था सारस्वत बँकेची ऋणी आहे

## प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्यदिन

हे दोन्ही महत्त्वाचे राष्ट्रीय सण संस्थेने प्रथेप्रमाणे प्रबोधन क्रीडाभवनावर साजरे केले. प्रजासत्ताकदिनाच्या दिवशी सेंट जॉन शाळेच्या मुलांनी विविध करमणुकीचे कार्यक्रम सादर केले.

## कुटुंब मेळावा

तीस वर्षांपूर्वी गोरेगावात **प्रबोधन** नावाचे एक रोपटे लावून तेव्हा पंचविशीत असलेल्या काही तरुणांनी प्रबोधन गोरेगाव या संस्थेची स्थापना केली ती उराशी एक ध्येय बाळगून. तीस वर्षांच्या कालावधीत संस्थेच्या कार्याचा व हाती घेतलेल्या उपक्रमांचा पसारा चांगलाच वाढला आहे हे नाकारणे शक्य नाही.

पंचविशीतले तेच तरुण आज नुसते प्रौढच नव्हे, तर आजोबाही झालेत. तरीसुद्धा उत्साह टिकवून आहेत. मुख्य म्हणजे संस्थेच्या भवितव्याचा सतत विचार करताना ताज्या दमाची नवी फळी उभारण्याच्या प्रयत्नातही असतात आणि म्हणूनच त्या ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या वतीने संस्थेचे संस्थापक **श्री. सुभाष देसाई** यांनी संस्थेशी संबंधीत काही तरुण कार्यकर्त्यांना साद घातली.

प्रबोधन संस्थेचे काम आणि कार्य जवळून पाहिले आहे, त्याबद्दलची आपुलकी त्यांच्या मनात असणारच, या विश्वासाने त्यांच्याशी दोन गोष्टी बोलण्यासाठी त्या सर्व तरुण कार्यकर्त्यांचे स्नेहसंमेलन त्यांच्या आई-वडिलांसोबत रविवार दिनांक १ सप्टेंबर २००२ रोजी प्रबोधन क्रीडाभवन येथे आयोजित करण्यात आले.

यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना श्री. सुभाष देसाई यांनी संस्थेची माहिती देताना प्रबोधन रक्तपेढी, क्रिकेट व संगीत अकादमी, निसर्ग सहली यांसारख्या आगामी योजना व प्रकल्पांबद्दल माहिती दिली. त्याचप्रमाणे डॉ. मनोहर अद्वानकर, श्री. विलास देवरुखकर व श्रीमती नीलाताई देसाई यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

## प्रबोधन बालवाडी

समाजाच्या अविकसित घटकांना उपयुक्त ठरणारे उपक्रम प्रबोधन यथाशक्ति आयोजित करीत असते. त्यानुसार जवाहर नगर, गोरेगाव (प.) व कोयना वसाहत, गोरेगाव (पू.) येथील झोपडपट्टी विभागात दोन बालवाड्या प्रबोधन संस्थेतर्फे माफक शुल्कात चालविण्यात येतात. ह्या दोन्ही बालवाड्यात असलेल्या ८० बालकांना पूर्व प्राथमिक स्वरूपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येते. असे शिक्षण घेतलेल्या मुलांनी पुढे शालेय शिक्षणात विशेष चमक दाखविल्याचे नजरेस आले आहे. संस्थेस सदर बालवाड्यांचे कार्य नियमित चालू ठेवण्यासाठी **सौ. शालिनी वारीसे** यांचे स्थापनेपासून मोलाचे सहकार्य लाभले आहे. प्रतिवर्षी ह्या बालवाड्यांसाठी **सारस्वत बँकेचे** आर्थिक सहकार्य उपलब्ध होते हे कृतज्ञता पूर्वक नमूद करणे आवश्यक आहे. संस्था सारस्वत बँकेची ऋणी आहे

## प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्यदिन

हे दोन्ही महत्त्वाचे राष्ट्रीय सण संस्थेने प्रथेप्रमाणे प्रबोधन क्रीडाभवनावर साजरे केले. प्रजासत्ताकदिनाच्या दिवशी सेंट जॉन शाळेच्या मुलांनी विविध करमणुकीचे कार्यक्रम सादर केले.

## कुटुंब मेळावा

तीस वर्षांपूर्वी गोरेगावात **प्रबोधन** नावाचे एक रोपटे लावून तेव्हा पंचविशीत असलेल्या काही तरुणांनी प्रबोधन गोरेगाव या संस्थेची स्थापना केली ती उराशी एक ध्येय बाळगून. तीस वर्षांच्या कालावधीत संस्थेच्या कार्याचा व हाती घेतलेल्या उपक्रमांचा पसारा चांगलाच वाढला आहे हे नाकारणे शक्य नाही.

पंचविशीतले तेच तरुण आज नुसते प्रौढच नव्हे, तर आजोबाही झालेत. तरीसुद्धा उत्साह टिकवून आहेत. मुख्य म्हणजे संस्थेच्या भवितव्याचा सतत विचार करताना ताज्या दमाची नवी फळी उभारण्याच्या प्रयत्नातही असतात आणि म्हणूनच त्या ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या वतीने संस्थेचे संस्थापक **श्री. सुभाष देसाई** यांनी संस्थेशी संबंधीत काही तरुण कार्यकर्त्यांना साद घातली.

प्रबोधन संस्थेचे काम आणि कार्य जवळून पाहिले आहे, त्याबद्दलची आपुलकी त्यांच्या मनात असणारच, या विश्वासाने त्यांच्याशी दोन गोष्टी बोलण्यासाठी त्या सर्व तरुण कार्यकर्त्यांचे स्नेहसंमेलन त्यांच्या आई-वडिलांसोबत रविवार दिनांक १ सप्टेंबर २००२ रोजी प्रबोधन क्रीडाभवन येथे आयोजित करण्यात आले.

यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना श्री. सुभाष देसाई यांनी संस्थेची माहिती देताना प्रबोधन रक्तपेढी, क्रिकेट व संगीत अकादमी, निसर्ग सहली यांसारख्या आगामी योजना व प्रकल्पांबद्दल माहिती दिली. त्याचप्रमाणे डॉ. मनोहर अद्वानकर, श्री. विलास देवरुखकर व श्रीमती नीलाताई देसाई यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

यावर्षीच्या रौप्यमहोत्सवी क्रीडामहोत्सवाचा उद्घाटन सोहळा सोमवार दि. २ डिसेंबर २००२ रोजी संपन्न झाला. हा सोहळा प्रमुख अतिथी **श्री. प्रदीप इंदुलकर**, अपर सचिव, क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, **श्री. कुलकर्णी** सहा. महाव्यवस्थापक स्टेट बँक व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. याप्रसंगी पाहुण्यांना व इतर मान्यवरांना संचलन स्पर्धेत भाग घेतलेल्या संघांनी मानवंदना दिली. उद्घाटन सोहळ्याप्रसंगी संस्थेच्या कराटेपटूंनी कराटेची चित्त थरारक प्रात्यक्षिके दाखवताना उपस्थितांची दाद मिळविली. त्याचप्रमाणे उपनगर जिल्ह्याच्या मल्लखांब पटूंनी मल्लखांबाची श्वास रोखून धरावयास लावणारी प्रात्यक्षिके सादर केली. सतत सात दिवस चाललेल्या ह्या क्रीडामहोत्सवात विजेत्या खेळाडूंना प्रमाणपत्रे व पदके तसेच संघांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह व पारितोषिके देऊन गौरवण्यात आले.

संस्थेच्या प्रेमापोटी अनेक मान्यवर या स्पर्धेला आवर्जून उपस्थित राहिले. त्यात आंतरराष्ट्रीय कीर्तिचा आक्रमक हॉकीपटू व भारताचा माजी कर्णधार **श्री. धनराज पिल्ले** यांनी वेळात वेळ काढून या क्रीडामहोत्सवाला भेट देऊन खेळाडूंना प्रोत्साहन दिले. तसेच लॉन टेनिस स्पर्धेतील विजयी खेळाडूंना त्यांच्या हस्ते पदके व प्रशस्तिपत्रके देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर **महानंद डेरी** या उद्योग समुहाचे वरिष्ठ व्यवस्थापक, **कोका कोला** या समुहाचे **श्री. रणजीत मराठे** हे आवर्जून उपस्थित राहिले.

प्रतिवर्षीप्रमाणे प्रबोधन क्रीडामहोत्सवाच्या शेवटच्या दिवशी सर्व स्पर्धांच्या अंतिम फेरी आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर लोकनृत्य स्पर्धाही झाल्या. शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेल्या आकर्षक लोकनृत्याचा आस्वाद उपस्थित प्रेक्षकांनी घेतला. या क्रीडामहोत्सवाचा सांगता समारंभ व पारितोषिक वितरण सोहळा रविवार दि. ८ डिसेंबर २००२ रोजी मुंबईचे महापौर मा. **श्री. महादेव देवळे** यांच्या शुभहस्ते पार पाडला त्यावेळी नगरसेवक **श्री. सुनिल प्रभू**, **प्रा. श्री. जगदीश वालावलकर**, आयडियल क्लासेस, **श्रीमती साधनाताई माने**, शिवसेना महिला विभाग प्रमुख व इतर मान्यवर उपस्थित होते.

या क्रीडामहोत्सवास महानंद डेअरी, आयडियल क्लासेस, बीपीसीएल, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, सारस्वत बँक, हिंदुस्थान पेट्रोलियम, रागा रेस्टोरंट, सिटी सेंटर, पगली साडी ॲण्ड ड्रेसेस, ग्रंथ बुक शॉप, सत्यसाई गॅस एजन्सी, मेसर्स निर्मल सिटस्, स्वामी फोटो स्टुडिओ, एआरबी एजन्सी, व्हर्लपुल एअर कंडिशनर, मुक्ता गॅस एजन्सी, ओम ॲण्ड अल्ट्रा फाईन मिनरल, सरदार इलेक्ट्रॉनिक्स, रत्ना रेस्टॉरंट, श्री महालक्ष्मी ट्रस्ट-विलेपार्ले यांचा पुरस्कार लाभला. त्या सर्वांची संस्था अत्यंत ऋणी आहे. यंदाच्या वर्षीचा सर्वोत्कृष्ट संघासाठी असणारा **प्रबोधन फिरते स्मृतिचिन्ह** विलेपार्ल्याच्या **माधवराव भागवत हायस्कूलने** पटकाविले.

**(सविस्तर निर्णयपत्रक परिशिष्ट 'ब' मध्ये पहावे)**

होताना उल्लेखनीय कामगिरी केली.

**श्रद्धा म्हापणकर**

- गेल्या वर्षाभरात झालेल्या विविध स्पर्धांमध्ये १० सुवर्ण, ६ रौप्य, ६ कांस्य अशी एकूण २२ पदके पटकाविली.
- सातारा येथे झालेल्या राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत उपनगर जिल्हा ॲथलेटिक्स संघाचे प्रतिनिधित्व केले.

## खो-खो

अतिशय गतिमान खेळ म्हणून ओळखला जाणाऱ्या **खो खो** ह्या भारतीय खेळासाठी मुंबई उपनगर जिल्हा खो-खो संघटनेच्या सहकार्याने संस्था खेळांच्या प्रसारासाठी व वाढीसाठी गेली अनेक वर्षे कार्यरत आहे. भारतीय खेळांच्या प्रसारासाठी संस्था सदैव अग्रेसर राहिली आहे.सदर क्रीडाप्रकारात प्रबोधनच्या खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी खालीलप्रमाणे :

**गणेश सावंत :**

- **एकलव्य पुरस्काराने** सन्मानित. सदर पुरस्कार भारतातील सर्वोत्कृष्ट खो खो खेळाडूस देण्यात येतो.
- महाराष्ट्र राज्य पुरुष खो खो संघात सतत तीन वर्षे निवड.
- नाशिक येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेत राज्यातील सर्वोत्कृष्ट आक्रमक खेळाडू म्हणून निवड करण्यात आली.
- मुंबई उपनगर जिल्हा पुरुष खो खो संघाचे सतत सहा वेळा प्रतिनिधित्व.

**तुषार मोरे :**

- राष्ट्रीय खेळ स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य पुरुष खो खो संघात निवड, स्पर्धा विशाखापटनम्, हैद्राबाद.
- पश्चिम विभागीय राष्ट्रीय खो खो स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य पुरुष खो खो संघात निवड, स्पर्धा - देवास, गुजरात.
- फेडरेशन चषक खुल्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य पुरुष खो खो संघात निवड, स्पर्धा - दार्जिलिंग.
- महाराष्ट्र राज्य पुरुष खो खो संघात सतत तीन वर्षे निवड.
- मुंबई उपनगर जिल्हा पुरुष खो खो संघाचे सतत सहा वेळा प्रतिनिधित्व.

**सत्यम चाळकेः**

- फेडरेशन चषक खुल्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य पुरुष खो खो संघात निवड, स्पर्धा - दार्जिलिंग.
- मुंबई उपनगर जिल्हा खो खो संघाचे सतत तीन वर्षे प्रतिनिधित्व.

**कुणाल तामसे**

- मुंबई उपनगर जिल्हा मल्लखांब संघाचे १४ वर्षाखालील गटात प्रतिनिधित्व.
- कै. शंकरराव राक्षे गुरुजी स्मृतीचषक हा सर्वोत्कृष्ट मल्लखांबपटूसाठी असणाऱ्या पुरस्काराचा मानकरी.
- जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत १४ वर्षाखालील गटातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड.

**उल्लेखनीय कामगिरी केलेले इतर खेळाडू**

अश्वथ साईगणेशन, भविन शहा, तेजस म्हात्रे, रिना स्वामी, सौरभ साईगणेशन, जान्हवी धारप गौतम वझे, नेहा भावे, मोहित सावंत, रुची सरय्या, ऑकार सावंत भोसले, कृतिका कपूर

## कराटे

जपान कराटे असोसिएशनशी संलग्नता स्विकारुन संस्थेने क्रीडाभवनाच्या स्थापनेपासून **कराटे**चे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. संरक्षण व चपळता यासाठी उपयुक्त असलेल्या या क्रीडाप्रकाराचा लाभ गोरेगाव परिसरातील अनेक जण क्रीडाभवनामध्ये चालणाऱ्या प्रशिक्षण वर्गात घेत आहेत. **श्री. सीताराम चव्हाण** व **श्री. विशाल सुर्वे** या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार होत असलेल्या कराटेपटूंनी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करताना अनेक पारितोषिकेही जिंकली आहेत.

जानेवारी २००३ मध्ये अंधेरी येथे झालेल्या १२ व्या इंटर डोजो स्पर्धेत प्रबोधनच्या खेळाडूंनी एकूण ४४ पदके पटकाविली. त्याचप्रमाणे साहिल देसाई, निरज ठाकूर, अनुजा मोरे, सुमिता आंबावले, दिव्या रेवणकर, तेजस सोनार व चंद्रवीर ठाकूर यांनी मुंबईत झालेल्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य कराटे संघाचे यशस्वी प्रतिनिधित्व केले.राष्ट्रीय स्पर्धेत दिव्या रेवणकर व सुनिता आंबावले यांनी वैयक्तिक गटात अनुक्रमे रौप्य व कांस्य पदके पटकाविली.

## टेबल टेनिस

प्रबोधन क्रीडाभवनाच्या स्थापनेपासून सुरु असलेल्या **टेबल टेनिस** प्रशिक्षण वर्गात प्रशिक्षक **श्री. प्रकाश केळकर** यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज साधारणतः २५ विद्यार्थी प्रशिक्षण घेतात. प्रबोधन येथे प्रशिक्षण घेत असलेल्या दिपेश भामरे व प्रियंका पाटील या दोन्ही खेळाडूंनी आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करताना वैयक्तिक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला.

# सनदी लेखापालांचा अहवाल

जयंत आपटे
सनदी लेखापाल
४/५४, महेश निवास
तिसरा रस्ता, लोकमान्य टिळक नगर
गोरेगाव (प.), मुंबई - ४०० ०६२.
दूरध्वनी २८७२६३४०/२८७८१७६३

प्रबोधन गोरेगाव संस्थेचे ३१मार्च २००३ रोजी पूर्ण झालेल्या वर्षाचे हिशेब आम्ही तपासले असून त्यासंबंधात पुढील माहिती देत आहोत.

- प्रबोधन गोरेगाव संस्थेच्या ३१मार्च २००३ अखेरील ताळेबंद व आय-व्यय पत्रकातील हिशेब आम्ही तपासले. संस्थेने सादर केलेली सांपत्तिक पत्रके ही संस्थेची जबाबदारी असते. संस्थेने सादर केलेल्या सांपत्तिक पत्रकावर आमचे मत देणे एव्हढीच आमची जबाबदारी.सर्व साधारणपणे स्विकारल्या जाणाऱ्या लेखापालनाच्या पद्धतीनुसारच आम्ही हिशेब तपासणी केलेली आहे. त्या अनुषंगानेच आम्ही आखणी करुन तपासणी पुरी केलेली आहे. सांपत्तिक पत्रकातील आकडेवारी पायाभूत चाचणी पुराव्या सहित उघड करुन सांगणे हे हिशेब तपासणीत अंतर्भूत असते. हिशेब तपासणीत संस्थेने केलेल्या जमाखर्चाची कारण मिमांसा देणे व संस्थेने केलेल्या अंदाजाची योग्य-अयोग्यता देणे हे अंतर्भूत असते. तसेच सर्वसाधारण आर्थिक तक्ते कशाप्रकारे सादर केलेले आहेत हे पण पाहिले जाते. आम्हाला आशा आहे की आम्ही केलेली हिशेब तपासणी ही आमच्या मताशी माफक आधारभूत असेल.

- आमच्या सद्सद्विवेकबुद्धीप्रमाणे आम्ही मिळविलेली सर्व माहिती व खुलासे हिशेब तपासणीसाठी आवश्यकच होते याची आम्हाला खात्री आहे.

- आमच्या मते आम्ही केलेल्या हिशेब तपासणीवरुन संस्थेने योग्य ती हिशेबी पुस्तके ठेवलेली आहेत.

- या तपासणी अहवालात हाताळलेले ताळेबंद आय-व्ययखाती ही संस्थेच्या हिशेबी पुस्तकाशी मिळती जुळती होती. आमच्या मते व आमच्या माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या खुलाशानुसार संस्थेचा ३१मार्च २००३ अखेरील ताळेबंद व आय-व्यय पत्रक आणि विश्वस्थ निधीतील जमा आणि खर्चातील बाकी इत्यादी खरे व स्वच्छ चित्र दाखविते.

**ज्ञान-कला-सेवा यांचा त्रिवेणी संगम !**

प्रबोधन
गोरेगाव

**प्रबोधन क्रीडाभवन**, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर,

गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ दूरध्वनी : २८७३ ४८ ६९, २८७२ ६२ ७८

www.prabodhan.org

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून

**प्रबोधन क्रीडाभवन**

या सर्वांगसुंदर क्रीडासंकुलामध्ये

क्रिकेट, जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्स, टेबलटेनिस, योग, खो-खो, कराटे व

नृत्य यांचे तज्ज्ञांकडून प्रशिक्षण उपलब्ध

तसेच सुसज्ज व्यायामशाळा, हेल्थसेंटर, स्टीमबाथ, सौनाबाथ, जाकूझी

---

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सहकार्यातून साकार झालेले

**प्रबोधन जॉगर्स पार्क**

टेनिस प्रशिक्षणाची आणि सरावाची सुविधा असलेली **टेनिस ॲकॅडेमी** आणि सभोवताली सुंदर वनराई असलेला **जॉगिंग ट्रॅक**

---

मराठी, इंग्रजी व हिंदी साहित्याने परिपूर्ण

**प्रबोधनकार ठाकरे वाचनालय**

प्रत्येक घरासाठी, घरातील प्रत्येकासाठी उत्तमोत्तम पुस्तके आणि बाळगोपाळांसाठी

ान-मनोरंजनाचा मेवा

**प्रबोधन जॉगर्स पार्क :** सिद्धार्थ नगर, रस्ता क्र. १७,

गोरेगाव (प.), मुंबई ४०० ०६२. दूरध्वनी : २८७८ २३ २४